**नियमित दिवाणी दावा क्र. ३४६/२०१६**

**निशाणी क्र.२३ खाली आदेश**

प्रस्तूतचा अर्ज वादीतर्फे न्यायालयीन आयुक्त, उप अधिकक्षक भूमी अभिलेख, पंढरपूर यांनी केलेल्या मोजणी रजिस्टर नंबर ३७८/२०१७ ची मोजणी प्रमाणे दावा मिळकतीच्या हद्दी कायम करण्याबबात आदेश होणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीतर्फे वकीलांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला आहे व गट नंबर १९१ ची फाळणी झाली नसल्याने व सर्वे रेकॉडला पोटहिस्से नसल्याचे हद्दी दाखविता येणार नहीत व अतिक्रमण क्षेत्र दाखविता येणार नाही, त्यामूळे मोजणीदाराने हद्दी व अतिक्रमण दाखविलेले नाही, असे कथन केले आहे.

२. वादीतर्फे वकील श्री देशमूख व प्रतिवादीतर्फे वकील श्री साळूंखे यांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी २० कडील आयुक्तांचा अहवाल व निशाणी १६ कडील आयुक्त नेमणूकीचा आदेश याचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

३. निशाणी १६ प्रमाणे दिनांक ०४.०२.२०१७ रोजी वादीतर्फे न्यायालयीन आयुक्त नेमणूकीचा अर्ज मंजूर करण्यात आला. सदरच्या आदेशामध्ये कलम ८ मध्ये, “उभय पक्षातील असलेले हद्दीबाबतचे वाद तसेच पूर्वीचा दाखल केलेला दावा व त्यामध्ये झालेली मोजणी विचारात घेता, उभय पक्षातील वादाचे कायम निराकरण करणेकामी भूमी अभिलेख, पंढरपूर यांचेकडून मुळ गट क्रमांक १९१ ची मोजणी करुन वादी व प्रतिवादींच्या पोटहिश्यांची मोजणी करुन हद्दीखुणा कायम करण्याबाबत व कोणत्या पक्षाने कोणत्या मिळकतीत अतिक्रमण केले आहे, हे दाखवून अहवाल वादीच्या खर्चाने मागविणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व संयुक्तीक वाटते” असे नमूद आहे. या आदेशाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांनी मुळ गट नंबर १९१ ची मोजणी करणे त्याच बरोबर त्यामध्ये असलेल्या वादी व प्रतिवादी यांच्या पोटहिश्यांची मोजणी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. याउपर, या आदेशाद्वारे पोटहिशयांच्या हद्दीखुणा कायम करणेबाबतही आदेशीत करण्यात आले आहे. न्यायालयीन आयुक्त यांनी निशाणी २० सोबत मोजणीचा नकाशा दाखल केला आहे. त्या नकाशाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणी रजिस्ट नंबर ८७८/२०१७ प्रमाणे दिनांक १६.०८.२०१७ रोजी गट क्रमाक १९१/१, १९१/२ब, १९१/२अ व १९१/३ ची मोजणी केली आहे. निशाणी २० सोबत दाखल असलेला नकाशाचा 'ब' आलेख याचे अवलोकन केले असता, तसेच सदर नकाशावर असलेल्या टीपा व खुलाश्याचे अवलोकन केले असता, मोजणीदाराने ७/१२ प्रमाणे तुटक लाल रेशेने गट नंबर १९१ मधील पोटहिश्याच्या अंतर्गत हद्दी नमूद केल्या आहेत. मात्र त्या निश्चित केल्याचे दिसून

येत नाही. मुळात न्यायालयीन आयुक्त यांना पोटहिश्यांची मोजणी करुन त्याच्या हद्दी निश्चित करणेबाबत स्पष्ट आदेश असतांनाही, व त्यांनी पोटहिश्यांची मोजणी करुन नकाशामध्ये ते पोटहिशे नकाशात तुटक लाल रेशेने दाखविले असतांनाही त्याच्या हद्दी निश्चित केले नसल्याचे स्पष्ट होते. त्यामूळे निशाणी १६ कडील आदेशा प्रमाणे हद्दी निश्चित करण्यासाठी सदरचे प्रकरण पुन्हा न्यायालयीन आयुक्त यांच्याकडे पाठविणे आवश्यक व संयुक्तीक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. सबब वादीचा अर्ज मंजूर करणे संयुक्तीक वाटते म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी २३ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. न्यायालयीन आयुक्त यांनी निशाणी १६ कडील अर्जाप्रमाणे गट नंबर १९१/१, १९१/२ब, १९१/२अ व १९१/३ यांची मोजणी रजिस्टर नंबर ८७८/२०१७ प्रमाणे हद्दी निश्चित कराव्यात.

३. न्यायालयीन आयुक्त यांना आवश्यकता वाटल्यास ते हद्दी निश्चीत करण्यासाठी फेरमोजणी करु शकतात.

४. हद्दी निश्चीत करण्यासाठी किंवा फेरमोजणी करण्याची आवश्यकता वाटल्यास त्याची होणारी फी वादीने अदा करावी.

५. न्यायालयीन आयुक्त यांनी सदरचा अहवाल ०१.०६.२०२४ पुर्वी न्यायालयात सादर करावा.

६. येणेप्रमाणे कमिशन पत्र जारी करण्यात यावे.

( आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2024.03.18 11:16:19 +0530

( एम. आर. कामत )

दिनांकः- १६.०३.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt. C. J. J. D. Pandharpur. |
| Name of Stenographer | : | R.M.Gogi. |
| Date | : | 16/03/2024. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 16/03/2024. |